जा.क्र.नांवाशमनपा/नसका/**CR-73**/2014
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-12.08.2014

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**दि.14.8.2014 रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका.**

**विषय क्र.1:-**

**संदर्भ:-** महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे(स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम 2014

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेले मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम 2003 आणि इतर सर्व नियम, आदेश, संलेख यांचे अधिक्रमण करून, महानगरपालिका क्षेत्रातील आकाशचिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण करणारे महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश चिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, 2014 अंमलात आणले असल्याने जाहिरात परवानगी धोरण नव्याने निश्चित करणे आवश्यक झाले आहे.

महानगरपालिका जाहिरात धोरण पुढीलप्रमाणे असेल-

1. महानगरपालिकेच्या जागा, इमारती किंवा जाहिरातक्षम स्थळांचा उपयोग करुन महानगरपालिकेचा महसूल वाढविणे.
2. जाहिरातीच्या माध्यमातून शहराचे सौंदर्यीकरण वाढविणे.
3. जास्तीत जास्त जाहिरातस्थळे विकसीत करुन व्यापार उद्योगांना चालना देणे.
4. व्यवसायिक जाहिरातदाराच्या साहाय्याने नागरीकांच्या हितासाठी उपयुक्त प्रबोधनपर जाहिराती प्रकाशीत करणे.
5. जाहिरातक्षम स्थळांचा अनाधिकृत वापर थांबविणे.
6. जाहिरात धोरणांमध्ये एकवाक्यता निर्माण करून सुसूत्रता आणणे.
7. जाहिरातीच्या माध्यमातून मिळणा-या महसूलातून नागरी वाहतूक निधी बळकट करणे व या निधीतून वाहतुकविषयी समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करणे व देखभाल करणे.

**जाहिरात कार्यप्रणाली व ठळक बाबी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध जाहिराती करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, 2014 अंतर्गत धोरण निश्चित करावयाचे असुन महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या कायम जाहिरात फलकांसह नव्यान उभारण्यात येणा-या सर्व जाहिराती करीता निर्देश खालीलप्रमाणे असतील.

**भाग-1**

**महापालिका हद्दीत जाहिरात फलक उभारणे बाबत.**

1) शहरातील सर्व महापालिका मालमत्तांवर, महानगरपालिका जागेवर व पथदिवे खांबावर असलेल्या जाहिरात स्थळांकरीता निवीदा मागवुन जाहिरातीचे हक्क द्यावेत. त्यापोटी येणा-या देकार रकमेत जागेच्या भाड्याचा समावेश राहील व जाहिरात कर वेगळा राहील.

2) महापालिका विद्युत खांब, गॅट्री व महानगरपालिका मालमत्ता व जमिनीवरील फलक लावण्याकरीता करीता दोन वर्षाकरीता निविदा मागवून जास्तीत जास्त देकार देणा-या अभिकरणास जाहिरात हक्क द्यावेत. निविदा आदेश प्राप्तीपासून तीन महीने फलक उभारणी कालावधी देय असेल, त्यानंतर निविदेच्या कालावधीची गणना के ली जाईल.

3) सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व प्रकारच्या जाहिरात स्थळाऐवजी उक्त नियमातील तरतुदीनुसार नव्याने सर्व प्रकारची जाहिरात स्थळे निश्चित करण्यात यावीत.

4) भाडे देकार मागवूनच त्या स्थळाचे निविदाद्वारे जास्तीत जास्त भाडे व जाहीरात फी आकारुन देण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 21 जुन 2014 च्या नियमांतील अटी व शर्तीस अधिन राहून आयुक्तांना राहतील. नव्याने निश्चित केलेल्या स्थळांकरीता जाहिर निवीदा मागवून जास्तीत जास्त भाडे देकार देणा-या अभिकरणास स्थळे द्यावीत.

5) विद्यमान करार किंवा ज्या दिनांकास हे नियम अंमलात येतील त्या दिनांकापासून तिन महिन्यांच्या सवलतीची मुद्दत यापैकी जे अगोदर समाप्त होईल. त्यावेळी महापालिकेच्या जमिनीवरील विद्यमान सर्व जाहिरात फलक काढून टाकण्यात येतील. यामध्ये महानगरपालिका मालमतांवरील तसेच खासगी इमारती व जमीनीवरील जाहिरात स्थळांचा समावेश राहील.

भाग -2

**जाहीरातदारान महानगरपालिकेसोबत करावयाचा करार, भुईभाडे व जाहीरात फी देण्याबाबत**

1) महापालिका मालमत्ता, रस्ते, उड्डाण पुल, विद्युत खांब व इतर ठिकाणे यावरील जाहिरातीचे हक्क देण्याकरीता निवीदा मागवूनच जादा भाडे देकार देणा-या अभिकरणास दोन वर्षाकरीता हक्क देण्यात यावेत.

2) जाहीरातीसाठी नव्याने जागा निश्चित झाल्यानंतर जागेच्या भाडयाबाबत महानगरपालिकेशी 100/- रुपयांच्या मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

3) संबंधित अभिकरणास जाहिरात स्थळांसाठी महापालिकेने निश्चित केलेल्या एकूण कालावधीचे वार्षिक भुईभाडे व वार्षिक जाहीरात फी एवढया रकमेचा अगाऊ भरणा करावा लागेल.

4) जाहिरात अभिकरणास विकास नियंत्रण विनियमांचे, अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

5) जर शुल्क विहीत करण्यात आलेल्या काळात प्रदान करण्यात आले नाही तर तीन महिन्याच्या विलंबाकरीता परवाना शुल्काच्या 25% रकमेइतकी आणि सहा महिन्याच्या विलंबाकरीता 50% रकमेइतकी आपसमेळाची रक्कम देय असेल. सहा महिन्याच्यापुढे होणा-या विलंबाकरीता परवाना रद्द करण्यात येईल.

6) कराराची मुद्दत संपल्यानंतर अभिकरणाने या जागा व या ठिकाणी जाहीरात करणेसाठी उभारलेली जागा ही महापालिकेस रिकामी करुन द्यावी लागेल.

7) आयुक्तांच्यालेखी परवानगीशिवाय कोणतेही अभिकरण जाहीरात लावणार नाही. दोन वर्ष मुद्दतीकरीता व्यतिरिक्त नव्याने निश्चित केलेल्या तात्पुरत्या जाहिरात स्थळांवर व खाजगी जाहिरात स्थळांवर जाहिरात करण्याकरीता प्रत्येक स्थळनिहाय वेगळा अर्ज करुन परवानगी घेणे आवश्यक राहील.

8) अर्जास पुढील दस्ताऐवज जोडण्यात येतील.

1. जिच्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे प्रस्तावित असेल त्या जमिनीच्या/ इमारतीच्या मालकाकडून घेतलेले नाहरकत प्रमाणपत्र
2. ज्या जमिनीवर जाहिरात करावयाची आहे ती जमीन महानगरपालिका, शासन, बंदर विश्वस्त व्यवस्था महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या सारख्या सार्वजनिक प्राधिकरणाकडून भाडे पट्टयाने देण्यात आलेली असेल तर पट्टाकाराचे (Leassor) ना हरकत प्रमाणपत्र देखील आवश्यक आहे.
3. इमारतीच्या गढीवरील फलकाबाबत, सर्वात वरच्या मजल्यावरील भोगवटादाराचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.
4. सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र असेल तर, संस्थेच्या सर्व सदस्य मंडळाच्या बैठकीमध्ये रितसर मंजुर केलेल्या ठरावाची, त्या संस्थेच्या लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेली प्रत.
5. त्या स्थानाच्या 1':2500" या प्रमाणातील आधारभूत नकाशाच्या आणि 1':250" या प्रमाणातील खंड नकाशाच्या दोन प्रती.
6. प्रस्तावित जाहिरात स्थळांची आखणी व रंगयोजना आणि त्याचे नेमके स्थान दर्शविणारे रेखाचित्र तसेच बाह्य प्रकाश खिळण्यांसह संगणक निर्मीती संकल्पचित्र यांच्या दोन प्रती
7. प्रस्तावित जाहिरात स्थळावरील प्रस्तावित फलकाच्या चिन्हांकनासह त्या स्थळांची 10X8 इंच आकाराची दोन छायाचित्रे.
8. त्या स्थानामध्ये 50 मीटरच्या आत एकाच रांगेत कोणतीही झाडे किंवा अन्य कोणताही फलक अस्तित्वात असल्याचे, त्यांच्या आकारासह दर्शविणा-या स्थानाच्या नकाशाच्या दोन प्रती.
9. आवश्यकता असल्यास, पोलीस (वाहतुक) आयुक्त आणि महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून सक्षम प्राधिकारी ना-हरकत प्रमाणपत्र मागवील.
10. जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे, भारत सरकारच्या नागरी विमानचालन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र
11. परवानाप्राप्त संरचना अभियंत्याने मान्य केलेला संरचनात्मक मांडणी किंवा आराखडा तसेच संरचनात्मक मांडणीचे हिशेब फलकाच्या संरचनेची मांडणी किंवा आराखडा जोडपत्र-एक मध्ये नमूद केलेल्या फलक उभारणीबाबतच्या विनिर्देशांनुसार असेल;
12. ज्या इमारतीवर जाहिरात उभारावयाची असेल त्या इमारतीचे, परवानाप्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना- मजबुती प्रमाणपत्र आणि फलकाच्या संरचनेचे संरचना-मजबुती प्रमाणपत्र;
13. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम अन्वये नोंदणी प्रमाणपत्र

**9) सर्वसाधारण शर्ती :**

जाहिरातीसाठी परवानगी पुढील मार्गदर्शक तत्त्वाद्वारे देण्यात येईल आणि अशी मार्गदर्शकतत्त्वे अतिरिक्त शर्ती असल्याचे मानण्यात येतील माहिती परवानगीचाच भाग असतील.

1. कंत्राटाच्या कालावधीमध्ये कोणतीही भर घालण्यास किंवा फेरबदल करण्यास आयुक्तांच्या पुर्व परवानगीशिवाय अनुमती दिली जाणार नाही. (जाहिरात बदलाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.)
2. जर आयुक्तांनी लेखी नमुद करावयाच्या कारणासाठी जाहीराती काढून टाकण्यास सांगितले असेल तर अभिकरणाने त्या ताबडतोब काढून टाकणे बंधनकारक राहील. जर त्या काढून टाकल्या नाही तर आयुक्तास अशी जाहीरात काढून टाकता येईल व त्या बाबतचा खर्च संबंधित अभिकरणाकडून वसुल करता येईल.
3. आयुक्तांचे समाधान होण्याइतपत जाहीरात स्वच्छ, सुबक आणि सुरक्षित स्थितीत असावयास पाहिजे. आक्षेपार्ह जाहिराती करता येणार नाहीत.
4. तात्पुरत्या जाहिराती विद्युत पथदिवे / वाहतूक सिग्नल इत्यादीवर लावण्यास प्रतिबंध असेल व अगोदर लावलेल्या अधिकृत जाहिरातीसमोर फलक लावता येणार नाही.
5. जाहिरातीमुळे अपघात वा दुर्घटना घडल्यास अभिकरणाची जबाबदारी असेल व जाहिरात फलका संदर्भात संबंधित अभिकरणास विमा काढणे बंधनकारक राहील.
6. जाहिरातीच्या मजकुरामुळे समाजाच्या कोणत्याही घटकांच्या भावना दुखावतील अथवा सामाजिक, धार्मिक तेढ निर्माण होईल अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असा मजकूर चित्रफित, घोषवाक्य, प्रतिमा इ.प्रदर्शित करता येणार नाही.
7. वाहतूक नियत्रंक दिव्याचे खांब, वृक्षांना हानी पोहचवून अथवा आधार घेऊनजाहिरात करता येणार नाही.
8. तात्पुरत्या जाहिरातींचा कालावधी एका महीन्यापर्यंत असेल परंतू अभिकरणाने त्यांना जाहिरात करावयाचा कालावधी निश्चित करवून घ्यावा व त्यानंतर जाहिरात परवानगीकरीता किमान तिन दिवस अगोदर महानगरपालिकेकडे अर्ज सादर करावा.
9. ठरवून दिलेल्या जाहिरात स्थळावर जाहिरात केली नाही तर, ती अनाधिकृत जाहिरात समजून काढण्यात येईल.
10. कॅनापे/ फुगे यावर जाहिराती करता येतील परंतू त्यामुळे वाहनधारकाचे लक्ष विचलित होणार नाही याबाबत काळजी घेण्यात येईल.
11. परवानाप्राप्त जाहिरातीसमोर दूसरी जाहिरात उभारल्यास विनापरवानगी जाहिरात समजून विनाविलंब काढण्यात येईल व ते साहित्य कोणत्याही सबबीवर परत करण्यात येणार नाही.
12. दुकाने / संस्था यावरील त्यांच्या नावाव्यतिरिक्त इतर जाहिरात फलक लावावयाचे असल्यास त्यांना महानगरपालिकेची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

भाग-3

**रोषणाई केलेल्या किंवा इलेक्ट्रॉनिक जाहिराती**

आयुक्त, पुढे दिलेल्या व वर्णनांच्या, रोषणाई केलेल्या किंवा इलेक्ट्रॉनिक जाहीरातींना परवानगी देणार नाही.

1) ज्यायोगे वाहनचालकाच्या किंवा पादचा-यांच्या डोळयांना त्रास होईल. ज्यामुळे वाहन चालविण्यास अन्य प्रकारे अडथळा निर्माण होईल. इतक्या प्रखरतेची किंवा चकाकीची रोषणाई केलेल्या जाहिराती.

2) ज्यायोगे कोणतीही अधिकृत वाहतूक चिन्ह, साधन किंवा सिग्नल ईत्यादी अस्पष्ट दिसतील किंवा त्यांची परिणामकारकता कमी होईल अशा, रोषणाई केलेल्या जाहीराती.

3) निवासी जागामधील निऑन जाहीरात फलके लुकलुकणारी नसावीत.

4) रोषणाई रात्री 10 वा./ 11 वा. लागु असणा-या वेळेनुसार बंद ठेवावा.

5) दृकश्राव्य किंवा चलचित्र डिजिटल जाहिरातींना परवानगी दिली जाणार नाही. एलइडी दर्शक पट (डिस्प्ले) हे केवळ स्थिर चित्री असावेत. किमान दर 10 सेकंदानंतर प्रतिमांमध्ये होणार बदल अनुज्ञेय असेल.

भाग-4

जाहिरात फलकांचा आकार-

1) जाहीरात फलकांचा प्रमाण आकार- पुढीलप्रमाणे असेल.

   1. 3.05 मीटर (10 फूट) X 6.10 मीटर (20 फूट)
   2. 6.10 मीटर (20 फूट) X 6.10 मीटर (20 फूट)
   3. 7.625 मीटर (25 फूट) X 7.625 मीटर (25 फूट)
   4. 9.15 मीटर (30 फूट) X 6.10 मीटर (20 फूट)
   5. 12.2 मीटर (40 फूट) X 3.05 मीटर (10 फूट)
   6. 12.2 मीटर (40 फूट) X 6.10 मीटर (20 फूट)

परंतु, खालील ठिकाणच्या जाहिरातींबाबत सक्षम प्राधिका-यास वेगवेगळ्या आकाराच्या जाहिरातींना अनुमती देता येईल.

(एक) निर्गम भिंत,

(दोन) भूयारी मार्गाचे प्रवेशद्वार

(तिन) वरपुलाचे कठडे आणि असेच इतर विषम आकाराचे कोनाडे त्याचप्रमाणे जलयाने, तराफे आणि वाहने.

2) कोणताही जाहीरात फलक रस्त्याच्या पातळीच्या 12.2 मीटर ( 40 फूट) पेक्षा अधिक उंचीवर उभारता येणार नाही. जाहीरात फलकाच्या पृष्ठतळ किंवा तळभाग हा, रस्त्याच्या पातळीपासून 3 मीटर (10 फूट) पेक्षा कमी नसेल, इतक्या उंचीवर असेल.

3) विद्यमान रस्त्याच्या किंवा मार्गाच्या रुंदीपासून पूढे 1.50 मीटर एवढे किमान अंतर ठेवण्यात येईल. पदपथावर कोणताही जाहीरात फलक किंवा जाहीरात लावण्यात येणार नाही.

4) जाहीरात फलकांनापुढील परिस्थितीत परवानगी देण्यात येणार नाही.

1. महानगरपालिकेच्या मते कोणत्याही जाहीरात फलकामुळे प्राधिकृत वाहतूक चिन्ह अथवा सिग्नल याबाबत गोंधळ निर्माण होण्याचा संभव असणे.
2. जाणा-या, येणा-या किंवा दोन मार्गी वाहनांना वाहतूक करण्यामध्ये अडवणूक होईल अथवा दिसण्यामध्ये अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने व अशा ठिकाणी कोणताही जाहीरात फलक लावणे.
3. समुद्र, सुर्योदय, सुर्यास्त, ऐतिहासिक, धार्मिक, विशिष्ट वास्तू व पुतळे पाहण्यासाठी असलेल्या ठिकाणाहून ते पाहण्यासाठी अडथळा निर्माण होईल अशा कोणत्याही जाहीरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही.
4. आयुक्त ठरवतील अशा पुरातत्व शास्त्रीय, ऐतिहासिक किंवा वंशीयदृष्टया महत्त्वाच्या असतील अशा इमारतींवर जाहिरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
5. ऐतिहासिक, पुरातत्वशास्त्रीय, वंशीयदृष्टया महत्त्वाच्या असलेल्या कोणत्याही इमारतीचे अथवा स्मारकाचे अवलोकन करण्यात अडथळा आणण्याचा संभव आहे अशा किंवा अशी कोणतीही इमारत अथवा स्मारक उभारण्याच्या आड येईल असा कोणताही जाहीरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
6. ज्यावरील जाहीरातीद्वारे सार्वजनिक नितिमत्ता आणि सभ्यता यांचे उल्लंघन होण्याचा संभव आहे असा जाहीरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही. अशी जाहीरात प्रदर्शित केल्याने सार्वजनिक नितिमत्ता व सभ्यता यांच्या प्रमाणकांचा भंग होईल अशी आयुक्तांची खात्री झाली तर, अशी लेखी सूचना प्राप्त झाल्यानंतर अभिकरण, ती जाहीरात तात्काळ काढून टाकील.
7. पादचा-यांच्या मार्गामध्ये किंवा त्यांना मार्ग दिसण्यामध्ये अडथळा निर्माण होईल अशा रस्त्यावरील जाहीरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
8. कोणत्याही स्थानिक सुखसोयीला बाधक ठरेल, अशा जाहीरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही.
9. अगोदर लावलेली कोणतीही जाहीरात दिसण्यामध्ये अडथळा निर्माण होईल असा जाहीरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
10. जाहीरात फलकाच्या प्रत्येक बाजुला 25 मीटर अंतरातील अस्तित्वात असलेले वृक्ष राखणे. जतन व संरक्षण करण्याची एकमेव जबाबदारी अभिकरणाची असेल या अटीची पुर्तता होण्यासाठी अशी संस्था व्याजमुक्त अनामत रक्कम रु.2,500/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे फक्त ) प्रत्येक वृक्षासाठी अनामत ठेव म्हणून ठेवील व नियम अस्तित्वात येण्यापूर्वी जाहीरात फलक उभारण्यास मान्यता मिळालेले अभिकरण फलकाच्या प्रत्येक बाजुला 25 मीटर अंतरातील दोन वर्षापेक्षा कमी वय असलेल्या वृक्षाची महानगरपालिकेच्या उद्यान अधिक्षकांच्या मान्यतेने इतरही जातीच्या वृक्षांची पुर्नस्थापना करेल. तसेच पुर्नस्थापनसाठी प्रती वृक्ष रु.500/- (रुपये पाचशे फक्त ) ठेव महानगरपालिकेकडे जमा करेल.

5) जाहिरात स्थळाच्या निविदेचा कालावधी सर्वसाधारणपणे 2 वर्षे असेल. महानगरपालिकेच्या जागेच्या बाबतीत विनिर्दिष्ट स्थळी जाहीरात लावण्याकरीता आयक्तांकडून लेखी परवानगी दिल्यानंतर, आयुक्त अभिकरणासोबत एक करार (दोन प्रतीत) करतील. खाजगी जागेवरील जाहीरात स्थळांचे नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तांकडून त्याबाबत विचार करण्यात येईल.

6) जाहीरातीसाठीचे भाडे आणि फी महानगरपालिकेने वेळोवेळी मान्य केलेल्या दरानूसार, अभिकरणाकडून वसूल करण्यात येईल, अभिकरण महानगरपालिकेला अग्रीम म्हणून भाडे किंवा फी देईल.

भाग-5

**<u>महापालिका हद्दीत प्रवेशद्वार (गॅंट्री) उभारणे बाबत.</u>**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (1949 चा 59) महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शन नियमन व नियंत्रण) नियम 2014 अन्वये स्थापन केलेल्या रचना केलेल्या सर्व

महानगरपालिकांसाठी कलम 456(अ) च्या पोटकलम 1 च्या आणि कलम 244 व 245 याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन

शासन निर्णय क्रमांक पीएमसी -3010/ प्र.क्रं.394/ 10 नवि 22 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शन नियमन व नियंत्रण) नियम 2014 तयार केलेले आहेत. या नियमास अधीनराहून महानगरपालिका खाजगी जागेत जाहिरात लावण्यास तात्पुरती कापडी फलक, होर्डीग व इतर जाहिराती लावण्यास परवानगी देते.

महापालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या नव्याने निश्चित केलेल्या जाहिरात स्थळांच्या जागेवर जाहीरात उभारण्यास परवानगी दिल्यास या माध्यमातून महापालिकेस महसूल प्राप्त होईल व जाहिरात फी आकारुन देण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे. त्याच धोरणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीत महामार्गावर ज्या ठिकाणी महापालिकेची हद्द सुरु होते, वा शहरात विविध ठिकाणी प्रवेशद्वार, दिशादर्शक उभारण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यपध्दती प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) महानगरपालिका हद्दतील प्रवेशद्वार (गॅंट्री) वर जाहिरात लावण्याकरीता निश्चित केलेल्या स्थळांकरीता निविदा मागवून जाहिरातीचे हक्क द्यावेत.

2) महानगरपालिका हद्दीमध्ये एखाद्या जागेवर नविन प्रवेशद्वार (ग्रॅंट्री) उभारण्याकरीता अभिकरणाने प्रस्ताव सादर केल्यास सदर जागेकरीता निवीदा मागवून जाहिरातीचे हक्क देण्यात येतील.

3) अभिकरणास प्रवेशद्वार जाहिरातीचे हक्क 2 वर्षाकरीता देण्यात येतील.

4) प्रवेशद्वार उभारण्याचा प्रस्ताव स्विकारणे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शन नियमन व नियंत्रण) नियम, 2014 च्या नियमातील अटी व शर्तीस अधीनराहून आयुक्तांना राहतील.

## भाग-6

### खाजगी वाहनांवरील जाहिराती-

1) महापालिका हद्दीमध्ये विविध रस्त्यावर वाहनांद्वारे जाहिराती करता येतील, परंतू प्रमुख रस्त्यावर जाहिराती / रोड शो करता येणार नाही. ज्यामुळे वाहतूकीस अडथळा होईल. ते वाहन अशारितीने जाहिरात चांगल्याप्रकारे प्रदर्शित करण्यासाठी मोक्याच्या ठिकाणाच्या आसपास चालविता येते किंवा ते उभे करता येते. परंतु त्याठिकाणी वाहतुकीस अडथळा होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

2) रोड शो वाहनांचे प्रती दिन, प्रति वाहनाचे दर सर्वसाधारण सभा ठरवेल, त्याप्रमाणे असतील.

3) खाजगी वाहनांवर जाहिराती लक्ष विचलित करणा-या नसाव्यात.

4) वाहनांवरील जाहिरातीकरीता शहर पोलीस वाहतूक शाखेचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

5 वाहनांवर जाहिराती करतांना जाहिरात / नाव / घोषणा हे सरफेसच्या 50% पेक्षा जास्त नसावीत.

6) जनवाहतुकीच्या वाहनांतर्गत फलक लावून जाहिराती करता येईल, परंतू त्यामुळे वाहनचालकाचे लक्ष विचलित होणार नाही याची तजविज करावी. एलइडी दर्शक पट (डिस्प्ले) हे केवळ स्थिर चित्री असावेत. किमान दर 10 सेकंदानंतर प्रतिमांमध्ये होणारा बदल अनुज्ञेय असेल.

7) प्रत्येक वाहनांकरीता वेगळा अर्ज करावा लागेल.

8) पोलीस वाहतूक विभागाने/ आर.टी.ओ.नी अशा जाहिरातींना आक्षेप घेतल्यास, त्या जाहिराती काढाव्या लागतील.

9) डिलेव्हरी व्हॅन/ वाहन यावर स्वत:च्या कंपनीच्या ब्रॅंडची जाहिरात करता येईल.परंतू त्याची जाहिरात कर भरुन परवानगी घेणे आवश्यक असेल.

10) खाजगी वाहनांवर हालचाल युक्त अनिमेशनद्वारे जाहिराती करता येणार नाहीत.

## भाग-7

### महापालिका शहर वाहतूक बसेसवरील जाहिरातीचे धोरण -

महापालिकेच्या परिवहन विभागाकडून चालविण्यात येणा-या बसेस, बसथांबे व बस डेपो यामध्ये शक्य असेल तेथे जाहिराती करणे, पी.पी.पी. (Public Private Partnership) पध्दतीचा अवलंब करणे इत्यादी प्रकारे प्रयत्न करण्यात यावेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये शहर बस वाहतूक बसेसवर आतील व बाहेरील बाजूने जाहिराती करण्यास निविदाद्वारे देकार मागवून जाहिरातीचे हक्क देण्यात यावेत.

1 **जाहिरातीचे प्रकार :**

क) महापालिकेच्या शहर वाहतूक बसेसवर बा हे री ल बाजूने सेल्फ अडीसिव्ह प्लॅस्टिक शिटवर बहुरंगी जाहिरात करता येईल. तथापि ऑईल पेटींग करता येणार नाही.

ख) परंतु बसच्या बाहेरील बाजूने कोणताही फलक / फ्रेम लावता ये णा र नाही किंवा प्रकाशित जाहिरात करता येणार नाही.

ग) बसच्या उजवी बाजू, डावी बाजू व पाठीमागील बाजूने निश्चित करून दिलेल्या आकारातच जाहिरात प्रसिध्द करावी लागेल.

घ) बसमध्ये वाहनचालकाच्या पाठीमागील बाजूस उजव्या कोप-यात काही भाग (महापालिकेने सुचविलेल्या. उदघोषणा, सूचना वा जाहिराती प्रसिध्द कराव्या लागतील).

ड) बसमधील जाहिरातीमुळे बसमधील महामंडळाच्या प्रवाशांकरीता असलेल्या सूचना झाकल्या जाणार नाहीत. याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

च) शहर वाहतूकीच्या बसेसमध्ये एलइडीवरुन जाहिराती करता येतील, परंतु त्या स्थिरचित्री असाव्यात. त्यामध्ये किमान दर 10 सेकंदानंतर प्रतिमांमध्ये होणारा बदल अनुज्ञेय असेल.

छ) महानगरपालिकेकडून आवश्यक असेल तेंव्हा प्रध्सिदीचा मजकुर पुरविण्यात येईल. तो मजकुर वा चित्ररुपी सूचनाही देण्यात येईल. ते सेल्फ अडीसिव्ह प्लॉस्टिक शिट वर संबंधित अभिकरणास विनामूल्य प्रसिध्द करावे लागेल.

ज) बसच्या आतील बाजूने चालकाच्या पाठीमागील बाजूस (जागा उपलब्धतेप्रमाणे निश्चित करु शकता येईल अशा आकारात) प्रकाशित जाहिरात करता येईल.

झ) प्रकाशित जाहिरातीचा बॉक्स 1' पेक्षा जादा जाडीचा नसावा.

ट) बसच्या पॅसेज वे मध्ये उभे राहणा-या प्रवाशांच्या सोयीसाठी असलेल्या हँडल्स, दरवाजाच्याआतील बाजूने वरील भागावर, सीटच्या मागील बाजूस जाहिराती या महानगरपालिकेच्या स्वारस्य प्रस्तावात नमूद असल्यास अनुज्ञेय राहतील.

ठ) बसेसच्या व्यतिरिक्त –

1. बस डेपो
2. बस टर्मिनल्स
3. बस थांबे

याठिकाणी व्यावसायिक जाहिराती अनुज्ञेय राहतील. तथापि पी.पी.पी. (Public Private Partnership) तत्त्वावरील विकास करावयाच्या बस डेपो, टर्मिनल्स व बसथांब्याच्या बाहय व आतील भागावर करावयाच्या जाहिरातीचे हक्क महानगरपालिकेकडे किंवा विकासकाकडे राहतील याचा निर्णय प्रकरण परत्वे घेतला जाईल. मात्र जाहिरातीच्या मजकुराबद्दल, वर्णाबद्दल त्यातील दृश्याबद्दल, चित्राबद्दलचे निर्बंध इतर जाहिरातींना जे लागू असतील, तेच कायम असतील.

दृकश्राव्य प्रकारातील जाहिराती :-

प्रचलित अधिनियमातील सर्व तरतूदीच्या मर्यादेत बस टर्मिनल्सवर दृकश्राव्य किंवा चलचित्र डिजीटल जाहिरातींना परवानगी दिली जाणार जाणार नाही. एलइडी दर्शकपट (डिस्प्ले) हे केवळ स्थिरचित्री असावेत. किमान दर 10 सेकंदानंतर प्रतिमामध्ये होणारा बदल अनुज्ञेय असेल. मात्र त्याचे हक्क महानगरपालिकेकडे निहीत असतील.

1 **इतर छापील प्रकारातील जाहिराती**:-

महानगरपालिकेने हक्क राखुन ठेवलेल्या अथवा विकासकास हस्तांतरीत केलेल्या अथवा बस ऑपरेटरला हस्तांतरीत केलेल्या हक्कांव्यतिरिक्त अन्य कोणालाही कोणत्याही स्वरुपात छापील व्यावसायिक जाहिरात पत्रके नमूद केलेल्या ठिकाणी प्रदर्शित, वाटप करता येणार नाहीत.

2 **जाहिरातीचा आकार :-**

उपलब्ध बसेस, जाहिरातीचे स्थळ, आकार व प्रकार यांचे निर्धारण आयुक्त करून देतील, त्याप्रमाणेच जाहिरातीचा आकार असेल.

3 **जाहिरातीचा कालावधी :-**

क) प्रत्येक बसेस वरील तात्पुरत्या जाहिरातींचा कालावधी 1 महिन्यापर्यंत असेल. तसेच निविदाद्वारे द्यावयाच्या जाहिरातीचा कालावधी 2 वर्षे असेल.

ख) जाहिरात जुनाट झाली किंवा फाटली तर वेळोवेळी तपासणी करून, सुस्थितीत जाहिरात ठेऊन बसेसची दुरावस्था वाटेल असे

साहित्य बदलावे लागेल.

ग) जाहिरात बदल करतांना आयुक्त यांची परवानगी घेऊनच जाहिरात प्रसिध्द करावी लागेल.

घ) जाहिरात हक्काच्या रकमेशिवाय लागू असलेले जाहिरात कर भरावे लागतील.

4. जाहिरात हक्क अहस्तांतरणीय :-

अ) अभिकरणास जाहिरातीची प्रसिध्दी स्वत:च करावी लागेल. दुस-या कोणत्याही व्यक्ती, संस्था वा अभिकरण यांना हक्काचे हस्तांतरण करता येणार नाही.

5. विशेष जाहिराती प्रसिध्द करणे :-

शहरातील नागरीकांना विशेष परिस्थितीमध्ये मोठया प्रमाणात माहिती होणे वा सूचना देण्याकरीता शासनाकडून पंधरा दिवसांपर्यंत जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक असेल.

7. प्रतिबंधित जाहिराती :-

क) जाहिरातीमध्ये तंबाखुजन्य पदार्थ, गुटखा, मद्य वा इतर नशेच्या पदार्थाची जाहिरात करता येणार नाही.

ख) कोणातीही व्यक्ती, संस्था व समाजाच्या भावना दु:खवणारी कोणतीही जाहिरात व मजकूर प्रसिध्द करता येणार नाही.

8. महानगरपालिकेचे विशेष अधिकार :-

अ) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील व्यक्ती / संस्था यांना महानगरपालिकेतर्फे काही महत्त्वच्या सूचना देणे वा महानगरपालिकेतर्फे प्रसिध्दी द्यावयाचा मजकूर वर्षातून पंधरा दिवसापर्यंत प्रसिध्द करावा लागेल.

9. **वाद निवारण:-**

जाहिराती वा मजकूर प्रसिध्दीद्वारे किंवा इतर प्रकारे वाद निर्माण झाल्यास, त्याविषयी आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल. त्यांच्या निर्णयानुसार अंमलबजावणी करणे अभिकरणास बंधनकारक असेल.

## भाग-8

जाहिरात धोरण सुधारणा :

1) वेळोवेळी सर्वसाधारण सभा व आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी केलेला आदेश व सूचनांची अंमलबजावणी करणे हा धोरणाचा भाग म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. .

2) जाहिराती सुबक व स्वच्छ असाव्यात, त्या जिर्ण असू नयेत. याबाबत तपासणी करुन वेळोवेळी जिर्ण जाहिराती काढाव्यात.

3) जाहिरातीमुळे चालक / वाहक यांना त्रास होणार नाही अथवा त्यांचे लक्ष विचलित होणार नाही अशा ठिकाणी व अशी जाहिरात करु नये. विशेषत: बस डेपो, बसथांबे, टर्मिनल्स ई.

4) जाहीरातीचा आकार व प्रकार निविदेत नमूद केल्याप्रमाणेच असावा. अपवादात्मक परिस्थितीमध्ये आयुक्त यांची मान्यता घेऊनच जाहिरातीचा प्रकार वा आकार बदलता येईल. परंतू आकार वाढला असेल तर निविदेनूसार प्राप्त होऊ शकणारी प्रती चौ.मी.दराने वाढीव रक्कम भरावी लागेल.

5) मध्ये वा बाहेर अनाधिकृत जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या तर त्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही नियुक्त अभिकरणास करावी लागेल. त्याकरीता महानगरपालिकेकडून कोणताही खर्च अनुज्ञेय राहणार नाही. त्यासाठीचे सर्व कायदेशीर अधिकार सदर अभिकरणास असतील.

6) नियुक्त अभिकरणाने उक्त जाहिरातीविषयक धोरण व इतर अटी मान्य करुन, विहीत कालावधीत नियमित रक्कम भरणा करावी. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबद्दलचा करारनामा रु.100/– बॉंड वर करुन देणे आवश्यक आहे.

7) एक वर्षाचा जाहिरात कर व हक्क देकाराच्या रकमेइतकी रकम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून विनाव्याजी ठेवावी लागेल.

8) वरील अटी व शर्तीचे उल्लघंन केल्यास, अभिकरणास एक नोटीस देऊन संबंधिताने सुधारणा न केल्यास करार रद्द करण्यात येईल व संबंधित अभिकरणास काळया यादीत टाकण्यात येईल.

उपरोक्त अटी व शर्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 अंतर्गत आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात फलक प्रदर्शन नियमन व नियंत्रण नियम, 2014 मधील तरतूदी नुसार पुरक म्हणून लागू असतील.

## भाग-9

परवान्याच्या शर्ती -

1) परवानाधारक, फक्त महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या जागेवर आणि परवान्यामध्ये उल्लेखिलेल्या कालावधीकरीताच आकाश-चिन्ह उभारेल. परवान्याच्या कालावधीमध्ये आकाश-चिन्ह सुस्थितीत राहील हे पाहणे देखील त्याचीच जबाबदारी असेल.

2) परवानाधारक, आकाश-चिन्हाच्या दर्शनीय ठिकाणी परवाना क्रमांक, वैधता दिनांक आणि त्याचे नांव किंवा प्रतीक लावील.

3) परवानाधारक, आकाश-चिन्ह उभारण्यापुर्वी संरचना अभियंत्याकडून स्थिरता प्रमाणपत्र घेईल. परवानाधारकाने लोकांना कोणतीही

हानी किंवा नुकसान पोहोचणार नाही अशाप्रकारे आकाश-चिन्ह सुस्थितीत ठेवण्याची काळजी घेईल. असे नाही घडले तर, ती केवळ त्याचीच जबाबदारी असेल आणि ती महानगरपालिकेची जबाबदारी असणार नाही. तसेच आकश-चिन्हाचा विमा उतरविण्याची जबाबदारी संबंधित परवानाधारकाची असेल.

4 परवानाधारकाने जाहिरात फलकाचा मालमत्ता कर नियमानुसार भरणे आवश्यक राहील.

5 परवानाधारकाने खालील बाबींचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द करण्यात येईल. -

क) महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगी शिवाय आकाश-चिन्हाच्या आकारात /ठिकाणात बदल केला तर,

ख) नैसर्गिक किंवा इतर कोणत्याही कारणामुळे जर आकाश-चिन्हाचे नुकसान झाले असेल तर,

ग) ज्यावर आकाश-चिन्ह उभारलेले आहे अशी इमारत महानगरपालिका प्राधिका-याने असुरक्षित असल्याचे घोषित केले असेल तर,

घ) महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय जर मुळ जमीनमालकाने आकाश-चिन्ह उभारणीस भर घातली असेल / फेरबदल केले असतील तर, दिलेला परवाना रद्द झाल्याचे मानन्यात येईल.

ड) रस्ता रुंदीकरणाच्या किंवा इतर सार्वजनिक प्रयोजनाच्या कारणामुळे परवानगी मिळालेल्या ठिकाणास जर बाधा पोहोचत असेल तर, महानगरपालिका प्राधिकरणाने करारनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत परवानाधारकास आकाश-चिन्ह काढून टाकावे लागेल. जर त्याने असे केले नाही तर, अशी सरंचना महानगरपालिकेकडून काढून टाकली जाईल आणि त्यासाठी होणारा खर्च परवानाधारकांकडून एका हप्त्यात वसूल करण्यात येईल. परवानगी रद्द केल्यामळे फक्त आगाऊ भरलेला जाहिरात कर परत मिळेल. त्याशिवाय परवानाधारकास इतर कोणतीही नुकसान भरपाई देय होणार नाही.

च) वरील मुद्दा 'ड' मध्ये उल्लेखिलेल्या कारणांमुळे जर आकाश चिन्हास दिलेली परवानगी रद्द केली असेल तर, पर्यायी जागेची व्यवस्था करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर असणार नाही व परवानाधारकाने इतर व्यक्ती, संस्था यांचेशी करार केला असेल, त्यास महानगरपालिका बांधील राहणार नाही.

छ) परवाना, हा देण्यांत आल्याच्या दिनांकापासून अमंलात येईल. परवानाधारक ठेव म्हणून सहा महीन्यांच्या भाडयाइतकी रक्कम जमा करील आणि खाली दिल्याप्रमाणे वार्षिक फी दोन सहामाही हप्त्यांत आगाऊ देईल - सदर रक्कम सहामाही कालावधीच्या पहिल्या महिन्यात भरणा करेल.

1 एप्रिल ते 30 सप्टेंबर

1 ऑक्टोंबर ते 31 मार्च

ज) परवान्याचा कालावधी संपल्यानंतर जर परवानाधारकाला परवानाच्या कालावधी पुढे सुरु ठेवावयाचा असेल तर, परवानाच्या समाप्तीच्या तारखेच्या 30 दिवस अगोदर संबंधित परवानाधारक महानगरपालिकेकडे विहीत नमुन्यात अर्ज करील. अशा विनंतीनूसार परवान्याचा कालावधी आणखी वाढविण्यास मंजुरी देणे महानगरपालिकेच्या आयुक्तास बंधनकारक राहणार नाही. जर, महानगरपालिका आयुक्ताने परवानाधारकाची विनंती विचारात घेतली नाही तर, स्वतःच्या खर्चाने आकाश-चिन्ह काढूनटाकणे ही परवानाधारकाची जबाबदारी राहील.

झ) परवानाधारक हा स्वतःच परवान्याचा वापर करील आणि महानगरपालिका आयुक्तांच्या पुर्व परवानगीशिवाय इतर कोणतीही व्यक्ती / संस्था त्याचा वापर करणार नाही.

महानगरपालिकेच्या मालमत्ता/ वाहने, सार्वजनिक मालमत्ता व खाजगी मालमत्ता इत्यादीवरील जाहीरातीच्या प्रयोजनासाठी धोरण व निर्देश याकरीता मान्यता मिळावी. सदरील अटी शर्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शन नियमन व नियंत्रण) नियम, 2 0 1 4 यास पुरक अटी व शर्ती असतील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.**2

गुंठेवारी अधिनियम 2001 पूर्वीच्या खुले भुखंड व त्यावरील बांधकाम नियमित करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.174 दि.24.01.2013 पर्यंत मुदतवाढ दिली होती. तद्नंतर संचिका स्वीकारण्याची कार्यवाही बंद करण्यात आलेली आहे. नांवाशमनपा हद्दीत अनेक अनाधिकृत वसाहती असून त्यातील बरेचसे नागरिकांनी त्यांच्या मालमत्ता गुंठेवारी अंतर्गत नियमित केलेल्या नाहीत अशा लोकांचा गुंठेवारी चालू करणे बाबत तगादा चालू आहे. त्यांअनुषंगाने शहरातील मालमत्ताधारकांना गुंठेवारी प्रकरणे दाखल करता यावीत तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी याकरीता गुंठेवारी अधिनियम 2001 अंतर्गत खुले भुखंड व अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याकरीता गुंठेवारीयोजनेस दि.31 डिसेंबर 2014 पर्यंत मुदतवाढ देणे करीताचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्त सादर.

**विषय क्र.**3

महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : अविवि-2009/प्र.क्र.43/09/का-1/ दि. 9 फेब्रुवारी 2009 अन्वये केंद्र शासनाने महाराष्ट्रातील निश्चीत केलेल्या 43 अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी प्राधान्याने तसेच ज्या शहराच्या एकुण लोकसंख्ये पैकी 10% पेक्षा जास्त अल्पसंख्याकाची लोकसंख्या (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शीख व पारशी) आहे, अशा शहरातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागा तर्फे अनुदान दिले जाणार असून मुलभूत नागरी सुविधांच्या उपलब्धतेसाठी खालील प्रमाणे कामे घेण्याबाबत सुचित केले आहे.

1) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती
2) पिण्याच्या पाण्याची सुविधा
3) विद्युत पुरवठा
4) सांडपाण्याची व्यवस्था
5) रस्ते/ पथदिवे
6) सार्वजनिक स्वच्छता गृहे
7) आंगणवाडी, बालवाडी केंद्रे
8) समाज मंदीर/सामाजिक सभागृह इ.
9) इदगाह

तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. क्षेविका-2014/ प्र.क्रं.52/क.-7 दि.21.06.2014 च्या अन्वये अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात विकास योजनेचे कामे सन 2014-15 करिता प्रस्तावित करण्यासाठी कळविण्यात आले आहे. त्या नुसार खालील प्रमाणे कामे सुचविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामांचे नांव<br>झोन क्र. **1** | अंदाजित रक्कम रु. लक्षात |
|---|---|---|---|
| 1 | 16 | प्रभाग क्र. 16 अंतर्गत नई आबादी येथील कब्रस्तान मध्ये अंतर्गत सी. सी. रस्त्यांचे बांधकाम करणे. | 3.30 |
| | | झोन क्र. **2** | |
| 1 | 4 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 4 अंतर्गत ताजनगर मस्जिदकडे जाणा-या रस्त्याचे सिमेंटीकरण करणे. | 3.30 |
| | | झोन क्र. **3** | |
| 1 | 32 | नांवाशमनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 32 मधील बारा इमाम मस्जिद कब्रस्तानमध्ये सी.सी.रस्ता करणे. | 3.30 |
| | | झोन क्र. **4** | |
| 1 | 19 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 19 मध्ये गुलाम दस्तगीर ते बाराईमाम मस्जिद पर्यंत सि.सि.रस्ता करणे. | 1.55 |
| 2 | 23 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 23 मध्ये दशमेखनगर भागातील सि.सि.दुरुस्त करणे. | 1.85 |
| | | झोन क्र. **5** | |
| 1 | 39 | नांवाशमनपा हद्दीत फिरदोस मस्जिद प्रभाग क्रं. 39 मध्ये आर.सी.सी. नाली करणे. | 1.65 |
| 2 | 36 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं. 36 मध्ये मस्जिद समोर खडीचा रस्ता तयार करणे . | 1.60 |
| | | झोन क्र. **6** | |
| 1 | 7 | नांवाशमनपा हद्दीत प्रभाग क्रं.7 मध्ये उल्हास नगर तरोडा (खु) भागात मस्जीदी समोर सी.सी. रस्ता व नालीचे बांधकाम करणे. | 3.30 |
| | | **एकुण रू.** | **20.00** |

वरील प्रमाणे सुचविलेल्या कामामधुन किंवा सर्व साधारण सभा सुचवतील ती कामे शासन निर्णयानुसार रु. 20.00 लक्षाच्या मर्यादीत कामास मान्यता देण्यास्तव प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर सादर.

**विषय क्र.4**

बिएसयुपी योजने अंतर्गत महानगरपालिका हद्दीत डिपीआर-I ते डिपीआर-XI अंतर्गत एकुण 27985 घरकुलास मान्यता प्राप्त आहे. त्यापैकी एन.टि.सी. मिल परिसरातील 5136 घरकुलांचे काम जागा हस्तातंरीत न झाल्याने सुरु होऊ शकलेली नाहीत. त्यामुळे सद्यस्थिती एकुण मंजुर 22849 पैकी 16150 ऐवढया घरकुलाचे रेखांकन देण्यात आले असुन त्यापैकी 12881 घरकुले पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरीत 3269 घरकुलाचे काम प्रगतीपथावर आहे. एनटीसी मिल परिसरातील घरकुले वगळता डिपीआर निहाय घरकुलाचा वाव अंतिम केला असता डिपीआर क्र.1 व 2 मध्ये अनुक्रमे 613 व 1435 घरकुल शिल्लक राहत आहेत.

1) डिपीआर-I साठी साल सन 2006, डिपीआर-II साठी साल सन 2007 व IV ते X साठी साल सन 2009 मध्ये मंजुरी प्राप्त असून सदरील डिपीआर मधील कामाचे दर हे जिल्हादरसुची 2005 ते 2008 दरम्यानचे असल्याने चालु जिल्हादरसुचीमधील दरानुसार बांधकाम साहित्याच्या किंमतींमध्ये किमान 30% ते 40% नी वाढ झाली आहे. डिपीआर-I, डिपीआर-II व IV ते X मधील घरकुलांची मंजुर किंमत प्रति घरकुल रु.2.35 लक्ष ते रु.2.80 लक्ष ऐवढी असुन त्याच घरकुलाची साल सन 2012 च्या मंजुर दराने न्यु. ब्रम्हपूरी डिपीआर क्र.11 मध्ये किंमत प्रति घरकुल रु.3.45 लक्ष एवढी आहे. त्यामुळे डिपीआर क्र.1 ते 10 या जुन्या डिपीआर ची न्यु. ब्रम्हपूरी च्या किंमतीशी तुलंना केली असता प्रति घरकुल रु.1.10 लक्ष ते 0.75 लक्ष ची तफावत आहे. त्यामुळे या तफावती मुळे नविन कंत्राटदार घरकुलांची कामे करण्यास तयार नाहीत.
2) डिपीआर क्र.1 व 2 मध्ये अनुक्रमे 468 व 1285 असे एकुण 1753 घरकुल लागणार असुन त्यापैकी 1603 घरकुल हे डिपीआर क्र.4 ते 9 मधील व 150 घरकुल डिपीआर क्र.10 मधील बचतीमधून करण्याचे प्रस्तावित आहे. डिपीआर क्र.4 ते 9 मधील दर हे डिपीआर क्र.1 व 2 पेक्षा अधिकचे आहेत. त्यामुळे याडिपीआरच्या दराने कंत्राटदार काम करणे शक्य आहे.
3) डिपीआर क्र.4 ते 9 मध्ये एकुण 7119 घरकुल मंजुर असून अपिल सल्लागार यांनी व कनिष्ठ अभियंता, उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी वाव अंतिम केला आसता सदर डिपीआरमध्ये 1603 घरकुलांची बचत होत आहे. त्यानुसार सदर बचत झालेली घरे ही डिपीआर क्र.1 व 2 मधील वस्त्यांसाठी लागणा-या घरकुलांसाठी स्थलांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे डिपीआर क्र.1 व 2 मधील लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळू शकेल व कंत्राटदार सदर डिपीआर क्र.4 ते 9 मधील दराने काम करण्यास तयार होतील.
4) डिपीआर क्र. 10 (तरोडा खु व बु) मध्ये एकुण 150 घरकुलांची बचत वाव अंतिम होत आहे. त्यामुळे सदर 150 घरकुल हे डिपीआर क्र.1 मध्ये स्थालंतर करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या दराने कंत्राटदार काम करण्यास तयार होतील व लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळू शकेल.
5) बिएसयुपी योजना पूर्णता लाभार्थ्यांवर विसंबून असुन लाभार्थी दिवाळी, दसरा, ईद, भिमजयंती, लग्न व इतर कार्यक्रमामुळे तसेच त्यांचे मर्जी प्रमाणे त्यांची अस्तीत्वातील जुनी घरे रिकामे करीत आहेत, त्यामुळे मुदतीत घरकुले रिकामे करुन न दिल्याने व निविदा दरामध्ये वाढ झाल्याने उर्वरीत घरकुलाचे कामे पूर्ण करण्याची मुळ कंत्राटदाराची मानसिकता राहीलेली नाही व जुन्या दरामुळे कंत्राटदार पूढिल कामे करण्यास असमर्थता दर्शवित आहेत.
6) बिएसयुपी योजनेस केंद्र शासनाने मार्च 2015 पर्यंत मुदतवाढ दिली असून सदरील मुदतीमध्ये पावसाळयाचा कालावधी वगळून केवळ 6 महीन्याचा कालावधी शिल्लक आहे. तसेच सदर योजनेस मुदतवाढ मिळण्याची शक्यता दिसून येत नाही. त्यामुळे डिपीआर क्र.1 व 2 ची 2048 घरकुले केंद्र शासनास परत करणे संयुक्तिक आहे व उर्वरित लागणारी 1753 घरकुले ही डिपीआर 4 ते 9 व 10 च्या बचतीमधून करणे शक्य होईल.
7) एनटीसी मिल यांचेकडून आजपर्यंत जमीन हस्तांतरण न झाल्यामुळे घरकुल बांधकामास सुरुवात झालेली नाही. त्यामुळे सदर डिपीआर केंद्र शासनास्तरावर रद्द करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच नोडल ऐजन्सी, म्हाडा, मुंबई यांनीही सदर प्रकल्प केंद्र शासनास परत करणेबाबत पत्राने कळविले आहे. त्यानुसार सदर प्रकल्पामधील डिपी रस्त्यासाठी झालेला व इतर खर्च वगळून डिपीआर क्र.3 हा प्रकल्प रद्द करुन, उर्वरित निधी केंद्र शासनास परत करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्र, वस्त्रोद्योग, मंत्रालय यांनी 2009 मध्ये ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यामुळे तसेच शासन स्तरावर जमिन हस्तांतरासाठी सकरात्मक कार्यवाही होत असल्याने सदर प्रकल्प हाती घेण्यात आला होता. तसेच तत्कालीन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री यांनी स्वतः एनटीसी मिल नांदेड येथे भेट देवून जागा हस्तांतरण करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु जागा हस्तांतर न झाल्याने व योजनेचा उर्वरित अल्प काळ शिल्लक असल्याने सदर प्रकल्प जागा हस्तांतर होवून पुर्ण करणे शक्य नाही, त्यामुळे प्रकल्प रद्द करणे आवश्यक आहे.
8) डिपीआर क्र.1 व 2 ची अनुक्रमे 613 व 1435 असे एकुण 2048 घरकुल जुने दर असल्यामुळे कंत्राटदार या दरावर काम करण्यास ईच्छुक नाहीत. तसेच डिपीआर क्र.1 व 2 मधील उर्वरित लाभार्थींना डिपीआर क्र.4 ते 10 मधील बचत होत असलेल्या घरकुलांचा लाभ देणे शक्य आहे. त्यामुळे डिपीआर क्र.1 ची 613 व डिपीआर क्र.2 ची 1435 असे एकुण 2048 घरकुले सिमित डिपीआर तयार करुन शासनास परत करणे आवश्यक आहे.

9) बीएसयुपी अंतर्गत महानगरपालिका हद्दीत विवधि झोपडपट्टी भागामध्ये घरकुलाचे बांधकाम व मुलभूत सुविधा पूरविणेचे कामास डिपीआर क्र.1 ते डिपीआर क्र.11 अन्वये एकुण 27985 घरकुलास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता कंत्राटदारानी सदरील निविदा निविदा दरापेक्षा ज्यास्तीच्या दराने भरुन सादर केल्या कारण डिपीआर मंजुरीस्तव सादर करते वेळेस त्यावर्षीच्या जिल्हादरसुची नुसार दर प्रस्तावीत करुन घरकुलाचे/ मुलभुत सुविधा पूरविणेच्या कामाचे अंदाज पत्रक सादर करण्यात आले. डिपीआर मंजुर होवून निविदा प्रक्रियेस विलंब झाल्याने व बाजारभावा मध्ये दरवाढ झाल्याने कंत्राटदार जुन्या दराप्रमाणे काम करण्यास तयार नव्हते. सदरील ज्यास्तीचा निविदा देकार निविदा मंजुरी करतेवेळेसच्या जिल्हा दर सुची नुसार तुलना करुन व कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन दर अंतीम करुन सदरील ज्यास्तीच्या देकारास मान्यता प्राप्तीसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करुन सदरील ज्यास्तीच्या निविदा देकारास मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले व कामास सुरुवात करण्यात आली.

10) तसेच कामे प्रगतीत असतांना काही अतिरिक्त बाबी उदभवल्या असुन सल्लागार यांनी शिफारस केल्यानुसार व प्रकल्प पूर्ण होण्याचे दृष्टीने सदरील अतिरिक्त बाबीचे काम हाती घेण्यात आले त्यानुसार डिपीआर निहाय निविदा दरापेक्षा ज्यास्तीचा देकार व अतिरिक्त बाबीचा तपशिल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

11) अ) निविदा किंमतीपेक्षा जास्तीची देकार रक्कम.

| अनु क्र. | डिपीआर क्र. | जास्तीची निविदा रक्कम |
|---|---|---|
| 1 | डिपीआर क्र. 1 | 1024.45 |
| 2 | डिपीआर क्र. 2 | 1668.09 |
| 3 | डिपीआर क्र. 3 | 366.88 |
| 4 | डिपीआर क्र. 4 | 201.45 |
| 5 | डिपीआर क्र. 5 | 197.47 |
| 6 | डिपीआर क्र. 6 | 253.61 |
| 7 | डिपीआर क्र. 7 | 157.18 |
| 8 | डिपीआर क्र. 8 | 347.61 |
| 9 | डिपीआर क्र. 9 | 1775.64 |
| 10 | डिपीआर क्र. 10 | 1020.87 |
| 11 | डिपीआर क्र. 11 | 449.14 |
| एकुण | | 7462.39 लक्ष |

ब) अतिरिक्त बाबीची रक्कम

| अनु क्र. | डिपीआर क्र. No. | अतिरीक्त बाबीची रक्कम |
|---|---|---|
| 1 | डिपीआर क्र. 1 | 6261.10 |
| 2 | डिपीआर क्र. 2 | 2302.27 |
| 3 | डिपीआर क्र. 3 | 0.00 |
| 4 | डिपीआर क्र. 4 | 99.66 |
| 5 | डिपीआर क्र. 5 | 35.11 |
| 6 | डिपीआर क्र. 6 | 39.71 |
| 7 | डिपीआर क्र. 7 | 50.99 |
| 8 | डिपीआर क्र. 8 | 58.26 |
| 9 | डिपीआर क्र. 9 | 160.04 |
| 10 | डिपीआर क्र. 10 | 0.00 |
| 11 | डिपीआर क्र. 11 | 0.00 |
| एकुण | | 3372.12 लक्ष |

उपरोक्त तक्त्यानुसार निविदा रक्कमेपेक्षा ज्यास्तीच्या निविदा वरील (डिपीआर क्र.1 ते डिपीआर क्र.11) रक्कम रु.7462.39 लक्ष असुन अतिरिक्त बाबीवरील रक्कम रु.3372.12 लक्ष एवढी येत आहे.

सदरील निविदा दरापेक्षा ज्यास्तीची देकार रक्कम व अतिरिक्त बाबीवरील खर्चास मुळ डिपीआर मध्ये कोणतीही तरतुद नसल्याने व शासनस्तरावर पाठपुरावा करुन ही शासनाकडुन सदर रक्कम मंजुर होत नाही. त्यामुळे सदरील अतिरिक्तबाबीवरील व निविदा किंमतीपेक्षा जास्तीची रक्कम मनपा फंडातुन कंत्राटदारास अदाई करणे आवश्यक असल्याचे मत मुलेप यांनी व्यक्त केले आहे. परंतु मनपा निधीतुन एवढी रक्कम देणे शक्य नाही. सदरील रक्कम मंजुर डिपीआर क्र.4 ते 9 मधील मुलभूत सुविधांच्या शिल्लक निधीतुन करणे शक्य आहे.

करीता वरील प्रमाणे नमुद डिपीआर क्र.1 मधील 613 व डिपीआर क्र.2 मधील 1435 घरकुले डिपीआर सिमित करुन तेवढया निधिसह शासनास परत करणे, एनटीसी मिल प्रकल्प क्र.3 रद्द करुन झालेला खर्च वगळून शासनास परत करणे, डिपीआर क्र.1 व 2 मध्ये लागणारी घरकुले डिपीआर क्र.4 ते 10 मधील बचतीमधून करणेच्या व प्राप्त निविदावरील ज्यास्तीची देकार रक्कम व अतिरिक्त बाबीवरील झालेला खर्च व पुढे होणारा खर्च बिएसयुपी च्या उपलब्ध निधीतुन अदाई करणेसाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.**5

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील एन.टी.सी. मिल भागात बिएसयुपी योजने अंतर्गत घरकुलाचे बांधकाम मे. पंधे इन्फ्राकॉन्स प्रा.लि. सोलापुर यांना कंत्राट देण्यात आले होते. संबंधीत कंत्राटदारांनी या ठिकाणी घरकुल बांधकामाची तयारी पण केली होती. परंतू गुरुव्दारा बोर्ड व एन.टी.सी. यांची जमिन हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण न झाल्यामुळे संबंधीत कंत्राटदाराला त्या क्षेत्रात घरकुल बांधकाम हाती घेता आले नाही. त्यामुळे मे. पंधे इन्फ्राकॉन्स प्रा.लि. सोलापुर यांनी त्यांना या घरकुल बांधकामासाठी दिलेल्या Mob. Adv वरील व्याज माफ करण्याची विनंती केली आहे. प्राप्त परिस्थिती विचारात घेता Mob. Adv वरील व्याज माफ करणे बाबत स्वतंत्र अशी तरतुद नसली तरी शासनाच्या जलसंपदा विभागाकडे सन 1979-80 मध्ये निर्माण झालेल्या अशा स्वारुपाच्या परिस्थित जलसंपदा विभागाने शासन Circular No.MIS 1081/84(1358)MAJ-6 dated:4$^{th}$Sept.1981 व्दारे व्याज माफीचा निर्णय घेतला होता.

महानगरपालिकेच्या बाबतीत असा निर्णय घ्यावयाचा असल्यास त्यासाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. व्याजाचा दर 12 टक्के आहे. आता सर्व बँकामध्ये बचत खात्यावर 5 व 6 टक्के व्याज दिले जाते अशा परिस्थितीत पुर्ण व्याज माफ करणे किंवा व्याजाचा दर 12 टक्के ऐवजी 6 टक्के करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव निर्णयास्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येतो.

-: **स.सदस्यांचे प्रस्ताव** :-

**विषय क्र.** 6 **प्रस्ताव**

सालसन 2011 ला जनसंपर्क अधिकारी या पदाचा जो ठराव पारित झाला आहे त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत

**सुचकः- गफार खान** **अनुमोदकः- विनय पाटील**

**विषय क्र.**7 **प्रस्ताव**

श्रेयस दिलीप मार्कण्डेय रा.श्री अपार्टमेंट, सन्मीत्र कॉलनी, वर्कशॉप, नांदेड हा आंतरराष्ट्रीय योगासन खेळाडू असून त्याने दि.20 ऑक्टोबर 2013 रोजी तैवान येथे जागतिक चॅम्पीयनशिप आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत सहभागी होवून रौप्य पदक व ट्रॉफी जिंकलेली आहे. त्यामुळे संपूर्ण जगभरात आपल्या भारत देशाचे व नांदेड शहराचे नावलौकिक करणा-या या योगासन खेळाडूस अभिनंदन करण्यात येते. तसेच त्यांच्या या नेत्रदिपक कामगिरीमुळे त्यांची मलेशिया व थायलंड येथे होणा-या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेमध्ये निवड झालेली आहे. त्यांना मलेशिया व थायलंड येथे सहभाग नोंदविण्यासाठी परदेशी जाणे-येणेसाठी आर्थिक सहाय्याची अत्यंत गरज व आवश्यकता असल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने रक्कम रु.2.50 लक्ष (अक्षरी दोन लक्ष पन्नास हजार फक्त) आर्थिक मदत देण्यासाठी सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचकः- आनंद शंकरराव चव्हाण** **अनुमोदकः- सौ.सुदर्शना खोमणे, सौ.पार्वती जिंदम**

**विषय क्र.8** **प्रस्ताव**

श्री राठोड ज्ञानेश्वर उत्तम, फायरमन म्हणून कार्यरत असून नुकतेच एका भीषण अपघातात त्यांचे मोठे बंधू मरण पावले असून या अपघातात त्यांचे आई वडील गंभीर जखमी झाले आहेत. घरात आई असून तिला रक्तदाब (हाय ब्लड प्रेशर) आहे त्यामूळे त्यांच्या परिवारात कर्ता कुणीही नाही. सदरील फायरमन हे परभणीचे असून त्यांची बदली परभणी येथील महानगरपालिकेत याच पदावर करण्यात यावी. करीता सदरील बदलीचा सकारात्मक विचार होवून मान्यता देणेस्तव सादर.

**सुचकः- सौ.श्रध्दा सुशिल चव्हाण** **अनुमोदकः- बाळासाहेब देशमूख, अभिषेक सौदे, सुंदरलाल गुरुखुर्दे, किशोर यादव**

**विषय क्र.9** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत दोन व्यायाम शाहा असुन त्यामध्ये एकूण 5 कुस्ती शिक्षक कार्यरत होते. त्यापैकी करण लंकाढाई कुस्ती शिक्षक यांचे 3 वर्षापुर्वी निधन झाल्यामुळे एका कुस्ती शिक्षकाची जागा रिक्त आहे. शहरातील नागरीकांना कुस्तीचे महत्व पटवून देवून शहरात उत्कृष्ट मल्ल निर्माण करण्याचे कार्य महापालिकेने हाती घेतले आहे. शहरात जास्तीत जास्त मल्ल तयार करुन राज्य पातळीवर मल्ल पाठविण्याचे मोलाचे कार्य आहे. सदरचे कर्तव्य पार पाडण्यासाठी उत्कृष्ट मल्लाची आवश्यकता आहे. श्री. सय्यद बारी स. महेबुब पटेल हे उत्कृष्ट मल्ल असुन ते जिल्हयात सर्व प्रथम कुस्तीपटू म्हणून त्यांना गौरविण्यात आले असून राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत त्यांनी अनेक वेळा भाग घेतला आहे. तसेच त्यांनी कुस्तीत विशेषप्राविण्य मिळविले आहे. तरी श्री. सय्यद बारी स. महेबुब पटेल यांना कुस्ती शिक्षक म्हणून एकत्रित वेतन रु. 5,000/- (अक्षरी पाच हजार रुपये) प्रतिमहा देण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचकः- स.शेरअली महेबुब अली** **अनुमोदकः- शफी अहेमद कुरेशी**

**विषय क्र.10** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.1 अ हा अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असून याप्रभागातील बहुतांशी नगरात मोठया प्रमाणात 90 टक्के अनुसूचित जाती (मागासवर्गीय) लोक मोठया प्रमाणात राहतात परंतू या नगरात आतापर्यंत त्यांना कोणत्याही मुलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत तसेच विकासकामे झालेली नाहीत. त्यामुळे येथील नागरिक मुलभूत सोयीपासून वंचित आहेत यामुळे या नगरातील नागरिकांना तातडीने मुलभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे त्यामुळे या नगरांना दलितवस्ती या योजनेत समावेश अत्यंत आवश्यक आहे त्यासाठी या नगरात दलितवस्ती योजनेअंतर्गत विकासकामे करण्याकरिता दलितवस्ती या योजनेअंतर्गत समावेश करुन दलितवस्ती म्हणून घोषित करणे आवश्यक आहे. करिता खालील नगरात दलितवस्ती म्हणन घोषित करुन तेथे मुलभूत सुविधा पुरविण्यात याव्यात.

1.सप्तगिरी कॉलनी 2. विकासनगर 3. जयनगर 4. उज्वलनगर 5. विजयनगर 6. तुळजाभवानीनगर 7. सारनाथ नगर 8. स्वस्तीक नगर 9. पाटबंधारे नगर 10. मायादेवी नगर.

**सुचकः- गंगाबाई नारायण कदम** **अनुमोदकः- विनय पाटील.**

**विषय क्र.11** **प्रस्ताव**

नांवामनपाकेच्या यांत्रीकी विभागात अभियंत्यसाठी श्री निखिल नंदकुमार कुलकर्णी रा.नांदेड हे बी.ई.मेकॅनिकल असून त्यांची कंत्राटी अभियंता म्हणून नियुक्ती करणे बाबत.

**सुचकः- आनंद शंकरराव चव्हाण** **अनुमोदकः- शफी अहेमद कुरेशी, नवल पोकर्णा**

**विषय क्र.12** **प्रस्ताव**

पुर्वी प्रमाणेच नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे साहित्यीक कै.नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला सुरु करण्यासाठी मान्यता देणे बाबत

**सुचकः- प्रा.ललिता बोकारे शिंदे** **अनुमोदकः- डॉ.करुणा जमदाडे**

**विषय क्र.13** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.25 महेबुबीयाकॉलनी भागात वर्ग 1 ते 7 सुरु असुन आरटिई कायद्यानुसार वर्ग 8 वा प्राथमिक शाळेस जोडला असल्यामूळे महेबुबी कॉलनी भागात सुरु असलेल्या मनपा शाळा येथे वर्ग 8 वर्ग सुरु करणे अत्यंत जरुरी आहे. कारण या शाळेतून वर्ग 7वी नंतरबाहेर पडणा-या विद्यार्थ्यांना दुस-या शाळेत प्रवेश घेण्यास अडचण् होत आहे तरी महेबुबीया कॉलनी देगुलूर नाका येथे महानगरपालिका प्राथमिक शाळेत वर्ग 8 वा सुरु करण्यास सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**सुचकः- स.शेर अली महेबुब अली** **अनुमोदकः- अ.लतिफ अ.मजिद**

**विषय क्र.14** **प्रस्ताव**

नांवाशमनपा हद्दीतील प्रभाग क्र.14 मध्ये हिंगोली ओव्हर ब्रिज (उड्डाणपुल) च्या खालील बाजूने विष्णूनगरकडे जाणा-या मुख्य रस्त्याच्या ठिकाणी कमाणीचे बांधकाम करुन या कमाणीस -हदय सम्राट कै. बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार विष्णुनगर असे नामकरण करण्यास मान्यता देणेस्तव सादर.

**सुचकः- अशोक रावणराव उमरेकर** **अनुमोदकः- गुरुखुदे सुंदरलाल (तुलजेश)**

**विषय क्र.15** **प्रस्ताव**

नांवामनपा हद्दीतील आनंदनगर भागातील वसंतनगर-बाबानगर रोड या चौकास **स्वराज्य चौक** असे नामकरण करण्यास मान्यता देणेस्तव सादर.

**सुचकः- नवल पोकर्णा** **अनुमोदकः- आनंद चव्हाण**

**विषय क्र.16** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील प्रभाग क्र.34 गाडीपुरा भागात खालीलप्रमाणे रस्त्यांना नावे देण्यात यावीत.

1. श्री रणजीत सिंह गहलोत यांच्या घरापासून ते श्री जोधसिंह गहलोत मेन रोड पर्यंतच्या रस्त्यास समाजसेवक व कविवर्य स्वर्गीय ठाकुर भिक्कमसिंह सुरजसिंह बैस मार्ग हे नाव देण्यात यावे

2. भायेकर यांच्या दुकानापासून ते मोहनसिंह ठाकूर यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यास समाजसेवक स्वर्गीय ठाकुर सुरजसिंह गुलाबसिंह परमार मार्ग असे नाव देण्यात यावे.

3.(बेला फोटो) दुकानापासून एकखांब मस्जीद पर्यंतच्या रस्त्यास माजी नगरसेवक स्व.रघुनाथसिंह कल्याणसिंह ठाकुर मार्ग हे नाव देण्यात यावे.

4. परमार यांच्या दुकानापासून ते किशोरसिंह पटेल यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यास समाजसेवक स्व.विठ्ठलसिंह रघुनाथसिंह तेहरा मार्ग हे नाव देण्यात यावे

**सुचकः- दिपकसिंह रावत** **अनुमोदकः- सौ.संगीता राओत्रे, सौ.वैशाली देशमुख.**

**स्वाक्षरीत/-**

**नगरसचिव,**

. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.